९५७

१४) मंजूर रेखांकन नकाशात पूर्व परवानगीशिवाय कोणताही बदल करण्यात येऊ नये.
१५) संदर्भित जागेचे मालकी हक्क, वहिवाट, ताबा, याबाबतची सविस्तर पडताळणी महसूल विभागाने त्यांचे स्तरावर करावी.
१६) अस्तित्वातील / नियोजित बांधकामाचे क्षेत्र हे मंजूर नकाशाप्रमाणे व खालील तक्त्याप्रमाणे असावे.

| जागेचे क्षेत्र (चौ.मी.) | राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ च्या रुंदीकरणाने बाधित क्षेत्र चौ.मी. | १२ मी. सेवारस्त्याने बाधित होणारे क्षेत्र चौ.मी. | कमाल अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) | एकुण प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) | वापर |
|---|---|---|---|---|---|
| ५१०७० | ५३२४ | ३५५२ | ३८८८४.१० | ३८८५२.४० | रहिवास व वाणिज्य |

१७) सदर प्रकरणात अर्जदार यांच्या मालकीचे ३५५२ चौ.मी. क्षेत्र राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ लगतच्या १२ मी. सेवारस्त्याने बाधित होत आहे. सदरचे क्षेत्र अर्जदार सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे विनामुल्य हस्तांतरीत करणार असून त्या आशयाचे बंधपत्र अर्जदार यांनी या कार्यालयाकडे सादर केलेले आहे. (छायाप्रत सोबत जोडली आहे.) त्या अनुषंगाने अर्जदार यांचेकडून बिनशेती परवानगी देणेपूर्वी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन तदनंतरच बिनशेती परवानगी देणे आवश्यक राहील.
१८) प्रस्तुत प्रकरणातील जागेतून २२ KV क्षमतेची उच्चदाब विद्युतवाहिनी जात असून सदर उच्चदाब विद्युतवाहिनीपासून दोन्ही बाजूस ५ मी. अंतरावर बांधकाम अनुज्ञेय करणेबाबत कार्यकारी अभियंता, महावितरण (महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.) कल्याण (ग्रामिण) विभाग यांनी पत्र क्र.EE/KLN(R)/Tech/4704, दि.07/09/2013 अन्वये ना-हरकत पत्र अर्जदार यांना दिलेले आहे. सदर ना-हरकत पत्राच्या अनुषंगाने आवश्यक ती खात्री व पडताळणी बिनशेती परवानगी देणेपूर्वी करण्यात यावी.
१९) सदर जागेच्या उपअधिक्षक,भूमि अभिलेख, कल्याण यांचेकडील प्रमाणीत मोजणी नकाशा मो.र.नं.५१३/२००८, ५२०/२००८, ५२१/२००८ तसेच मो.र.नं.८७८/२००९, दि.१/१२/२००९ अर्जदार यांनी या कार्यालयाकडे मूळ प्रतित सादर केलेले आहेत. सदर मोजणी नकाशावर ७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे क्रमांक नमूद केलेले नसून सदर जागेचे जुने सर्व्हे क्रमांक नमूद केलेले आहेत. तेव्हा सदर जागेचे जुने सर्व्हे क्रमांक व नविन सर्व्हे क्रमांक या अनुषंगाने अर्जदार यांच्या मालकीच्या जागेबाबत मोजणी नकाशात दर्शविलेल्या हद्दीच्या अनुषंगाने आवश्यक ती खात्री व पडताळणी बिनशेती परवानगी देणेपूर्वी आपल्या स्तरावर करणे आवश्यक राहील.
२०) सदर जागेपैकी ७५६० चौ.मी. जागेत या कार्यालयाने पत्र क्र.९२८, दि.३०/६/२००९ अन्वये वाणिज्य वापरासाठी बांधकाम नकाशांना मंजूरीची शिफारस केलेली आहे. सदरचे नकाशे आता निष्प्रभावित करण्यात येत आहेत.
२१) सदर प्रकरणात अर्जदार यांनी दुय्यम निबंधक,कल्याण-२ यांचेकडे दस्त क्रमांक.३७४५/२०११ अन्वये नोंदणी केलेले कुलमुखत्यार पत्राची छायाप्रत तसेच Confirmation Deed ची छायाप्रत या कार्यालयाकडे सादर केलेली आहे. सदर दस्तऐवजाच्या अनुषंगाने बिनशेती परवानगी देणेपूर्वी आवश्यक ती खात्री व पडताळणी करणे आवश्यक राहील.
२२) प्रस्तावासोबत प्राप्तकागदपत्राच्या आधारे या कार्यालयाने अभिप्राय दिले आहे. उक्त कागदपत्रे विधिग्राहयतेबाबत जागा मालक/विकास अधिकारपत्र धारक वास्तुविशारद / सल्लागार अभियंता इत्यादी जबाबदार राहील.
२३) शासनाकडून मंजूर सुधारीत मुंबई महानगर प्रदेश प्रादेशिक योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी अर्जदारावर बंधनकारक राहतील.
२४) मौ.म्हारळ खुर्द, ता. कल्याण हे गांव उल्हासनगर नागरी संकुलन क्षेत्राचे आत येत असल्याने विषयाधीन जागेस नागरी जमिन कमाल धारणा कायदा लागू होतो किंवा कसे याबाबत खातरजमा व त्या अनुषंगाने आवश्यक ना हरकत दाखला उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर नागरी संकुलन, ठाणे यांचे कार्यालयाकडून घेण्यात यावा.
२५) विषयाधिन जागेवरील बांधकामाचे मंजुर नकाशाप्रमाणे कार्यान्वयन बांधकाम साहित्याची गुणवत्ता व दर्जा प्रस्तावित इमारतीचे आर.सी.सी. डिझाईन अग्निशमन व्यवस्था इत्यादी बाबत जमिनमालक/विकासकर्ता/वास्तुविशारद/सल्लागार अभियंता/स्ट्रक्चरल अभियंता यांची जबाबदारी राहील.